महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय शिरूर
Taluka Veterinary Polyclinic, Shirur
जोशीवाडी, नगर —पुणे रोड शिरूर-४१२२१०.
Joshiwadi, Nagar-Pune Road, Shirur-412210.
Email.- acahtmvpshirurpune@gmail.com

जावक क्रमांक : तालपसचि/लेखा/वृक्ष/लिलाव/७१/२०२६ शिरूर जि. पुणे दिनांक. २१.०२.२०२६

# जाहिर लिलाव

या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, शिरूर जि. पुणे (जनावरांचा दवाखाना) येथे बुधवार दि. ०४/०३/२०२६ रोजी या कार्यालयाच्या शिरूर नगर परिषद हद्दीमध्ये नगर भूमापन क्रमांक १९६९/१ या जागेतील खालील वृक्षांचा जाहीर लिलाव समिती समोर दुपारी ३:०० वाजता करण्यात येईल.

१) चिंच-२
२) लिंब -१
३) काशीद-१
४) शिसम-१
५) निलगिरी -१
६) सुबाभूळ -१
७) वाळलेले वृक्ष -२

तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी खालील प्रमाणे दर्शविलेल्या दिवशी व तारखेस आवश्यक कागद पत्रासह उपस्थित राहावे. सदर जाहीर लिलावांची सविस्तर नोटीस पशुसंवर्धन विभागाच्या https://dahd.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली आहे. लिलावाच्या नियम व अटींची प्रत सोबत जोडण्यात आली आहे.

**स्थळ :- तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय, जुना नगर- पुणे रोड, जोशीवाडी, शिरूर, जि. पुणे**
**बुधवार दि. ०४/०३/२०२६, दुपारी ३:००**

**सोबत :-** नियम व अटींची प्रत

सहाय्यक आयुक्त,पशुसंवर्धन
तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय
शिरूर जि. पुणे

**नोटीस बोर्ड**

१) जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) कार्यालय, खडकी जि. पुणे
२) पंचायत समिती कार्यालय, शिरूर- नोटीस बोर्ड
३) तहसील कार्यालय, शिरूर- नोटीस बोर्ड
४) शिरूर नगरपरिषद नोटीस बोर्ड
५) वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय, पाबळ रोड, शिरूर- नोटीस बोर्ड

## वृक्षांचा जाहीर लिलाव दि. ०४/०३/२०२६ दु. ३.००
## नियम व अटी

१) लिलावात भाग घेण्यापूवी रूपये ७००/- (अक्षरी रक्कम रुपये सातशे मात्र) अनामत रक्कम भरावी लागेल.

२)लिलाव समितीने ठरविलेल्या किंमती पेक्षा कमी किंमत आल्यास किंवा इतर कोणत्याही कारणास्तव लिलाव रद्द करण्याचा लिलाव समितीस अधिकार राहील.

३)लिलाव ज्या व्यक्तीच्या नावे मंजूर होईल त्यांनी लिलावात बोललेली रक्कम ताबडतोब या कार्यालयात भरणा करावी लागेल. रक्कम भरणा केल्या शिवाय लिलाव झालेली झाडे काढता येणार नाहीत.

४) लिलावात भाग घेतलेल्या परंतु लिलाव मंजूर न झालेल्या व्यक्तीची अनामत रक्कम ताबडतोब लिलाव संपल्याबरोबर परत करण्यात येईल.

५) लिलाव मंजूर झालेल्या व्यक्तिने विहित नमुन्यातील अटी व शर्ती मान्य असल्याचा करारनामा रु. १००/- च्या स्टॅम्प पेपर वर करून देणे बंधनकारक राहील.

६) एकदा लिलाव झाल्यानंतर वृक्ष रक्षण करण्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही व संबंधितांनी लिलाव झालेली झाडे ५ दिवसांच्या आत स्वखर्चाने काढून नेणे बंधनकारक राहील.

७) सदर कार्यवाही ( वृक्षांची तोड ) करतेवेळी विद्युत तारा अडथळा ठरत असतील तर विद्युत प्रवाह खंडित करुनच कार्यवाही करावी.

८) सदरील कार्यवाही करतेवेळी सुरक्षतेची जबाबदारी आपली असेल याची आपण नोंद घ्यावी.

९) सदरील कार्यवाही करतेवेळी आजुबाजुच्या इमारतींना धोका पोहोचणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०) सदरील झाडे काढताना आसपासच्या इमारतींना हानी पोहचल्यास अथवा जिवीत हानी झाल्यास या सर्व परिणामाची जबाबदारी आपली वैयक्तिक राहील व नुकसान भरपाई झाल्यास ती आपणास द्यावी लागेल.

११) लिलाव धारकाकडून (लिलाव ज्यांचे नावे झाला असेल) शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यास भरपाई द्यावी लागेल. तसेच वृक्ष काढून घेतल्या नंतर झालेला कचरा साफ करून देण्याची जबाबदारी संबंधितांची राहील.

१२)ज्या व्यक्तीच्या नावे लिलाव मंजूर होईल त्या व्यक्तीने वृक्ष काढण्याआधी सहायक आयुक्त पशुसंवर्धन, **तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय,** शिरूर जि. पुणे यांची पुर्वपरवानगी घ्यावी लागेल.

सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन
तालुका पशुवैद्यकीय सर्वचिकीत्सालय,
शिरूर, ता. शिरूर जि. पुणे